IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# अभिजात मराठीचा दर्जा आणि संशोधन: भाषेचे प्राचीनत्व आणि भविष्यातील दिशा

**प्रा. डॉ. शीला धम्मपाल रत्नाकर**
प्रमुख, मराठी विभाग
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर.

**सारांश** (Abstract): *जननी आणि जन्मभूमीप्रमाणे जन्मभाषेला महत्त्व आहे. कोणत्याही राष्ट्राची आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इत्यादी सर्वकंष प्रगती ही त्या राष्ट्राच्या भाषिक अविष्कार व आस्मितेवर अवलंबून असते. मराठी भाषेच्या इतिहासाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास तिचा प्रवास अनेकदा प्रतिकूल परिस्थितीतून झालेला आहे. संतमहंतांनी, साहित्यीकांनी, विविध राजे, महाराजांनी तिची अभिमानपूर्वक पाठराखण करून तिचा महिमा गायिला आहे. अशा या मराठी भाषेविषयी 'अमृतातेही पैजा जिंकणारी….. परिमलामाजी कस्तुरी…..' ही बिरूदावली केवळ स्तवनात्मक वा औपचारिक नाही. "कोणत्याही समाजाची भाषा ही त्या समाजाच्या संस्कृतीची राखण आणि विकास करणारी शक्ती असते. भाषा म्हणजे केवळ तिचा शब्दकोश नव्हे वा तिचे व्याकरण नव्हे किंबहुना तिचे केवळ साहित्यही नव्हे. समाजाची वैचारिक आणि जाणिवात्मक संचित एका युगातून दुसऱ्या युगात नेण्याचे पर्यायाने त्या समाजाच्या जीवनाला आशय आणि आकार देण्याचे कार्यही भाषाच करीत असते. तेव्हा भाषेसंबंधीचे प्रेम म्हणजे शब्दावरील प्रेम नव्हे तर समाजाची जडणघडण करणाऱ्या महाशक्तीवरील प्रेम" .१ दिनांक १२ व १३ ऑगस्ट १९८९ रोजी मुंबईमध्ये भरलेल्या जागतिक मराठी परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रजांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणातून मराठी भाषा व संस्कृती विषयीचा रास्त अभिमान व मराठी भाषेच्या संवर्धनाविषयी तळमळ व्यक्त केलेली दिसून येते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी शेवटपर्यंत प्रयत्नशील राहिले म्हणन २७ फेब्रुवारी हा दिवस कवीवर्य कुसुमाग्रजांचा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून दरवर्षी साजरा केला जातो.*

**मुख्य शब्द**: अभिजात मराठीचा दर्जा आणि संशोधन: भाषेचे प्राचीनत्व आणि भविष्यातील दिशा

## I. प्रस्तावना :

जननी आणि जन्मभूमीप्रमाणे जन्मभाषेला महत्त्व आहे. कोणत्याही राष्ट्राची आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इत्यादी सर्वकंष प्रगती ही त्या राष्ट्राच्या भाषिक अविष्कार व आस्मितेवर अवलंबून असते. मराठी भाषेच्या इतिहासाकडे दृष्टीक्षेप टाकल्यास तिचा प्रवास अनेकदा प्रतिकूल परिस्थितीतून झालेला आहे. संतमहंतांनी, साहित्यीकांनी, विविध राजे, महाराजांनी तिची अभिमानपूर्वक पाठराखण करून तिचा महिमा गायिला आहे. अशा या मराठी भाषेविषयी 'अमृतातेही पैजा जिंकणारी….. परिमलामाजी कस्तुरी…..' ही बिरूदावली केवळ स्तवनात्मक वा औपचारिक नाही. "कोणत्याही समाजाची भाषा ही त्या समाजाच्या संस्कृतीची राखण आणि विकास करणारी शक्ती असते. भाषा म्हणजे केवळ तिचा शब्दकोश नव्हे वा तिचे व्याकरण नव्हे किंबहुना तिचे केवळ साहित्यही नव्हे. समाजाची वैचारिक आणि जाणिवात्मक संचित एका युगातून दुसऱ्या युगात नेण्याचे पर्यायाने त्या समाजाच्या जीवनाला आशय आणि आकार देण्याचे कार्यही भाषाच करीत असते. तेव्हा भाषेसंबंधीचे प्रेम म्हणजे शब्दावरील प्रेम नव्हे तर समाजाची जडणघडण करणाऱ्या महाशक्तीवरील प्रेम" .१ दिनांक १२ व १३ ऑगस्ट १९८९ रोजी मुंबईमध्ये भरलेल्या जागतिक मराठी परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रजांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणातून मराठी भाषा व संस्कृती विषयीचा रास्त अभिमान व मराठी भाषेच्या संवर्धनाविषयी तळमळ व्यक्त केलेली दिसून येते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी शेवटपर्यंत प्रयत्नशील राहिले म्हणन २७ फेब्रुवारी हा दिवस कवीवर्य कुसुमाग्रजांचा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून दरवर्षी साजरा केला जातो.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

## II. अभिजात मराठीचा दर्जा

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून दोन हजार वर्षापूर्वीचे तेलूगू, सिंहली, पाली भाषेतील मराठी भाषेचे पुरावे देण्यात आले. शिवनेरीच्या नाणेघाटातील शिलालेख हा महाराष्ट्रीय प्राकृमध्ये असल्याचा उल्लेख करण्यात आला. भारतात एक हजार (१०००) लेणी आहेत. त्यातील एकट्या मराष्ट्रात आठशे (८००) लेणी आहेत. मराठी ही संस्कृत इतकीच जुनी असल्याचे सांगताना महानुभव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, असे अनेक पुरावे देऊन सिद्ध करण्यात आले. त्याचबरोबर अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी काही निकषांचीही आवश्यकता असते. त्या भाषा स्वतंत्र् असणे, त्यात मौलिक साहित्यनिर्मीती होणे, भाषेचे वय किमान दोन हजार वर्षे असणे, सलग प्रवाही अस्तित्व असणे हे सर्व निकष् मराठी भाषेने पार केलेले आहेत. तरीही 'मराठी संस्कृतीपासून निर्माण झालेली असून ती भाषा स्वतंत्र नाही.' असा संस्कृतप्रेमीचा मतप्रवाह आजही प्रबळ आहे. पण आद्य रामकथा सांगणारे महाकाव्य वाल्मिकीचे रामायण नसून महाराष्ट्री प्राकृतातील विमल सुरी लिखित 'पउमचरीय' हे जैन दृष्टीकोनातील महाकाव्य आदि रामकाव्य आहे. इ.स.वी सन ४ मध्ये प्रसिद्ध झाले असे पुराव्यानिशी सिद्ध झालेले आहे. लिखित पुराव्यानुसार मराठी भाषेचा इतिहास किमान दोन हजार (२०००) वर्षे जुना असल्याचे दिसते. प्राचीन महाराष्ट्र प्राकृताचीच विकसित होत आलेली अवस्था म्हणजे आपण बोलतो-लिहितो ती मराठी वररूचीने या आद्य महाराष्ट्रीय प्राकृता ाचे व्याकरण इ.स.पू २०० च्या आसपास लिहिले होते. याचा अर्थ त्याआधीही अनेक शतके मराठी भाषा बोलीभाषा म्हणून प्रचलित होती.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून महाराष्ट्र सरकारने रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने मराठीच्या प्राचीनतेचा अभ्यास करून १२ जुलै १९१३ रोजी केंद्र सरकारला अहवाल सादर केला. त्यानंतर १४ फेब्रुवारी २०२४ रोजी परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे सरहद संस्थेचे सचिव नहार तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मीती मंडळ आणि भाषा सल्लागार समिती यांच्या पदसिद्ध अध्यक्षांचा समावेश असलेली समिती नेमली. केंद्र सरकारने ३ ऑक्टोंबर २०२४ मध्ये मराठी भाषेला अभिजात भाषा (CLASSICAL LANGUAGE) दर्जा दिला. लिखित पुराव्यानुसार मराठी भाषेचा इतिहास दोन हजार वर्षाचा जुना असल्याचे पुरावे देण्यात आले. महाराष्ट्र शासनाने दरवर्षी ३ ऑक्टोंबर हा दिवस 'अभिजात मराठी भाषा गौरव दिन' किंवा 'मराठी भाषा सन्मान दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. मराठी भाषिकांच्या दृष्टीने ही सन्मानाची ऐतिहासिक घटना आहे.

## III. मराठी भाषेचे संशोधन

भारताला स्वतंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाहीच्या तत्वानूसार भाषावार प्रांतरचना निर्माण झाली. दिनांक १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी विचावंतांशी विनिमय करून १९६० मध्ये 'महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळा' ची स्थापना केली ती मराठीच्या सर्वांगीण विकासाची दृष्टी ठेवूनच तेव्हापासून हे मंडळ कार्यरत आहे. गेल्या ६५ वर्षात शासनाने मराठीच्या भाषा आणि साहित्य विकासासाठी मराठी भाषा संचनालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र ज्ञान मंडळ, विविध विद्यापिठाची स्थापना व विकास विश्वकोश निर्मीत वैश्विक साहित्याची मराठी भाषांतरे असे विपुल कार्य केले असून प्रत्येक ज ि ल्ह्यात माहिती केंद्र, ग्रंथ विक्रीकेंद्र व गंथालये उभारली आहेत. भाषा व साहित्य विकासासाठी पुरस्कार प्रकाशने, अनुदान. इ. सर्व प्रकारे प्रयत्न सुरू आहेत. कृ. पा कुलकर्णी यांच्या मते "मराठी साहित्यात सर्व बाजूने संशोधन वाढले आहे विकसित झालेले आहे."२ तर मराठी भाषा, साहित्य संस्कृतीच्या अभिवृध्दीसाठीमराठी संशोधनासाठी स्वतंत्र मराठी विद्यापिठाची गरज असल्याचे सांगताना डॉ. वि.भ. कोलते म्हणतात "मातृभाषेच्या एकाच माध्यमातून एकाच प्रकारचे शिक्षण सर्वांना उपलब्ध होणे अगत्याचे आहे त्यासाठी जनसामान्यांची भाषा हीच सर्व क्षेत्रात, सर्व स्तरांवर शिक्षणाची भाषा झाली पाहिजे. महाराष्ट्रातील आजची स्थितीप्रिय विद्यापीठे आजच्या परिस्थितीत हे कार्य करू शकणार नाहीत. त्यासाठी सर्व विद्याशाखातील, सर्व विषयात, सर्व स्तरांवर मराठी माध्यमातून शिक्षण देणारे व संशोधन करणारे एक स्वतंत्र मराठी विद्यापीठ स्थापन झाले पाहिजे."३

जगात सहा हजार भाषा आहेत. भारतात सोळाशे पन्नास (१६५०) पेक्षा अधिक मातृभाषा बोलल्या जातात. एकट्या मराठी भाषेच्या एकोणचाळीस बोलींचा उल्लेख सर जॉर्ज ग्रिअर्सन यांनी केला आहे. हे आयरिश गृहस्थ आय सी एस होते. इंग्रज सरकारकडे भारतातील अंमलदार म्हणून प्रशासनात कार्यरत होते. त्यांनी हिंदूस्थानच्या भाषेचे सर्वेक्षण करून मराठी बोलणाऱ्यांची संख्या १९व्या शतकाच्या शेवटी १ कोटी ७७ लाख ७९ हजार एवढी नोंदविली आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

डॉ. गणेश देवी यांनी बोलीभाषेच्या संशोधन कार्याला वाहून घेतलेले आपल्या देशातील अग्रणीय अभ्यासक आहेत. भाषेच्या संदर्भात ते म्हणतात. 'भाषा ही सतत बदलती प्रवाही प्रयोगशील असली तरी तर मानवी आवाक्यातील आहे. पण त्याचबरोबर जगाचं आकलन करण्याची माणसाची क्षमता मौखिक भाषेवर आधारित आहे त्यामुळे ती त्यानुसारच नियंत्रित निश्चित झालेली आहे. हेही लक्षात घेतले पाहिजे त्यामुळेच आपल्याला असे म्हणता येईल की, भाषा एक सामाजिक संस्था आहे."४ मराठी भाषा सध्या संक्रमण काळातून जात आहे, हे निर्विवाद सत्य आहे. विज्ञान तंत्रज्ञानातील बदलामुळे भाषेचा चेहरामोहराच इतका बदलून गेला आहे की, 'मोबाईल' आणि 'कॉम्प्युटर' यांच्याशी निगडित नवी परिभाषा आणि शब्दप्रयोग यांचा सुळसुळाट झाला आहे. भाषा ही समस्थ समाजाची देणगी असून सर्व बदलांची कारणे अनेक पदरी आहेत. वेगाने सुरू झालेले अभिसरण हे त्यापैकी एक कारण आहे. भाषा हा सर्वांच्या जिवाव्याचा विषय आहे. भाषा ही एक सामाजिक संस्था असल्याने सामाजिक परिस्थितीनुसार भाषा बदलत राहते.

## IV. मराठी भाषेचे प्राचीनत्व

इ.स. पहिल्या (१) शतकातील नाणेघाट, पाले आणि लोहगड येथील शिलालेख हे प्राचीन मराठीचे लिखित रूप दर्शवितात. महाराष्ट्र जैन धर्म किती प्राचीन काळात पोहचला होता. याचेही पाले व लोहगड येथील शिलालेख निदर्शक आहेत. इ.स.पू २२० ते सन ६३० या साडेचारशे वर्षाच्या सातवाहन काळातील बौद्ध आणि जैन विहारातील असंख्य महाराष्ट्री प्राकृतमधील शिलालेख आज उपलब्ध आहेत. तसे संस्कृतमध्ये नाहीत.

मराठी भाषेतील स्वतंत्र् साहित्य काव्य आणि महाकाव्याचा इतिहास पुरातन आहे. हाल सातवाहन राजाने इ.स.वी सनाच्या पहिल्या शतकात संकलित केलेल्या (७००) सातशे गाथांचा समावेश असलेले 'गाथा सप्तशती' तर आज काव्यरसिकांना चांगलाच माहित आहे. याचकाळातील 'अंगविज्जा' हा तत्कालीन समाजजीवन व संस्कृतीचे दर्शन घडविणारा महाराष्ट्री प्राकृतातील ग्रंथ गद्यात लिहिलेला आद्य ग्रंथ आहे. मराठी अतिप्राचीन भाषा असून ती संस्कृतपासून निर्माण झालेली भाषा नव्हे, हे ब्लॉक रिचर्ड पिशेल, हरगोविंद सेठ ते आजच्या पिढीचे संशोधक संजय सोनावणे यांनी सप्रमाण दाखवून दिले आहे.

मराठी भाषेची सर्वात प्राचीन रूपे आपल्याला जुने ताम्रपट, शिलालेख व प्राचीन साहित्यातून आढळतात. इ.स.वी सन ७७८ सातशे अष्ठ्यात्तर मध्ये उद्योतन सुरी यांनी लिहिलेल्या 'कुवयलमाला' या ग्रंथात मराठी भाषेची शब्दरूपे सापडतात. इ.स.१११६ मध्ये कर्नाटक मधील श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या पुतळ्याखालील शिलालेखात 'श्री चामुण्डराये करविले, गंगाराजे सुताले करविले' एकाखाली एक अशा दोन ओळी आहेत. इ.स.११८८ मध्ये मुकुंदराजाने लिहिलेल्या 'विवेकसिंधू' हा ग्रंथ मराठी वाङ्मयाच्या अभ्यासाच्या दृष्टीने प्रारंभ म्हणावा लागेल. त्यानंतर शंभर वर्षांनी शके (१२१२) मध्ये ज्ञानेश्वरांनी लिहिलेली 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ अजूनही टिकून आहे ही मराठी भाषेची लिखित रूपे मानली जातात.

पूर्वी राजाश्रयास एक चांगली परंपरा होती. राजा हा पंडितांचा आश्रयदाता असे. कलावंतांचे जीवन राजाश्रयावरच समृद्ध व्हावयाचे. विक्रम भोज, हर्षवर्धन इ. राजांच्या दरबारात व्यास, कालिदास, बाणभट्ट, भवभूती सारखे साहित्यीक राजाश्रयाने वाढले. अकबराने आपल्या दरबारात नवरत्नांची नेमणूक करून तानसेन सारख्या कलावंतास आश्रय दिला होता. शिवाजी महाराजांच्या पदरी भूषणकवी होता. मोरोपंताना पेशव्यांचे व्याही बाबूजी नाईक बारामतीकरांचा आश्रय होता. कोकाट्या यशवंतराव नावांच्या खुशालचंद्र श्रीमंतांचा कवी नागेश आश्रित होता. सौंदर्यलहरी व लहरसुंदर ही टीका लिहिणाऱ्या ललितानंदाला बडोद्याच्या फत्तेसिंग महाराजांचा आश्रय होता. आजच्या लोकशाहीच्या युगात सरकारी पुरस्कार, बक्षिसे, अनुदाने, शिष्यवृत्त्या याद्वारे राजाश्रयाची परंपरा पुढे चालविली जात आहे. राजेलोकांमुळे साहित्यसंवर्धनास मदत झाली आहे. राजे लोक धर्मास जसा आश्रय देत असत त्या भाषेस दरबारी भाषा असे मानले जायचे. दरबारी हुकूम, फर्मान, खलिते, सनदा त्या भाषेतून लिहिल्या जात असत. त्यातून 'राजभाषा' ही कल्पना उद्यास आली. हे मराठी राज्य उद्याला यावे म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांपासून प्रयत्न सूरू होते.

## V. अभिजात मराठी भाषेच्या भविष्यातील दिशा

अभिजात मराठी भाषेविषयी भविष्यातील दिशा पाहण्याअगोदर मराठी भाषेचा वर्तमान काळ अभ्यासणे आवश्यक आहे. 'मराठी भाषेचे वर्तमान स्वरूप' हे पुस्तक जेष्ठ समिक्षक डॉ सुधीर रसाळ यांच्या अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण चिंतनातून सिद्ध झाले आहे. मराठी भाषेच्या सद्यकालीन व्यवस्थेची मीमांसा करताना रसाळांनी स्वातंत्र्योत्तर काळापासून ते आजपर्यंत बदलत गेलेल्या भाषा-संस्कृतीविषयक धोरणांबाबत परखड भाष्य केले आहे. सात प्रकरणांमधून विविध विषयांचे पैलू उजेडात आणले आहेत. 'ज्ञानभाषेची

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

संकल्पना'   सविस्तर उलगडलेली आहे. मातृभाषा हे ज्ञानभाषेचे नैसर्गिक माध्यम असते. नवनिर्मीतीच्या सुप्त क्षमता मातृभाषेतचं दडलेलया असतात. मात्र शिक्षणात याला प्राधान्य न दिल्यामुळे रसाळांच्या मते "आपली विद्यापीठे ही ज्ञाननिर्मीतीची नव्हे, तर माहितीवितरणाची केंद्रे ठरली आहेत. भाषावार प्रांतरचनेमागील सांस्कृतिक विकासाचे उदिष्टही त्यामुळे साध्य झाले नाही. मराठीचा एकही शब्द न उच्चारता महाराष्ट्रात संपूर्ण आयुष्य काढण्यासाची सवलत आपण परभाषिकांना दिली आहे. जागतिकीकरणांनंतर आपण कौटुंबिक व्यवहारही इंग्लिशमध्ये सुरू केला आहे. मातृभाषा ही आपली सेंद्रिय अवयव असते. याचा आपल्याला विसर पडला आहे."५ पुढे त्यांनी अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकातील मराठीचे आजचे वास्तव तपासताना खंत व्यक्त केली आहे. 'वाङ्:मयीन  संस्कृती आणि संस्थात्मक साहित्यव्यवहार'   यांचा आढावा घेताना मुद्रणपूर्व काळापासून ते आजपर्यंत झालेले बदल नोंदविले आहेत. १९०६ साली स्थापन झालेल्या 'महाराष्ट्र साहित्य परिषद'   व इतर संस्था, नियतकालिके, साहित्यसंमेलने यांचे कार्य लक्षात घेतले आहे. मात्र, अद्यापही मराठी वाङ्मयीन संस्कृती सर्व समाजाची झालेली नाही ही लेखकाच अभिप्राय आहे.  'मराठीतील परभाषिक आक्रमणे, इंग्लिश आणि हिंदी या भाषांची आक्रमणे थोपवताना आपण कमी पडतो. हे त्यातुन ठळकपणे बजावले आहे. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, राजकर्त्यांच्या महाराष्ट्र द्वेशाचा लोकभेदाचा निषेध करून तत्कालीन अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी मंत्रीपदाचा दिलेला राजीनामा आदि तपशील महत्वाचे आहेत. आज हिंदीचे आक्रमण, भाषा, नाटक, चित्रपट इ. करमणूकीची साधने आणि जाहिराती या मार्गाने मराठी संस्कृती ही धोक्यात येत आहे. वास्तविक आपल्या भाषेचे व संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रत्येकाला घटनासंमत हक्क आहे. तो आपण बजावला पाहिजे. ही समाजाची उत्कट आणि प्रखर भावना आहे. डॉ सुधीर रसाळ यांनी केलेले समाजचिंतन सर्वांना आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त करते.

मराठी भाषेची भविष्यातील दिशा काय असेल असे अनेकजन प्रश्न करतात. मराठी भाषेचे भवितव्य काय? ती टिकून राहिल का? या चिंता मराठीच्या हितचिंतकांना त्रस्त करीत आहेत. मराठीच्या मूमूर्ष अवस्थेची चिंता अव्वल इंग्रजीपासून सुरू झाली. विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी प्रथम तिचा उच्चार केला आहे. इंगंजीचे स्वभाषेवर आक्रमण होताना दिसत होते. एका अर्थाने इंग्रजीचा स्वीकार झाला इतकेच नव्हे तर स्वागतही झाले त्यामुळे इंग्रजीला 'वाघीणीचे दूध'   म्हणण्यात आले. इंग्रजीच्या आगमनाने मराठीचा झपाट्याने ऱ्हास होणार अशी भिती राष्ट्रप्रेमी मंडळीनां वाटली होती. कालांतराने मराठी ही 'भाषांमाजी'   मराठी भाषा असा तिचा विचार गौरव केला. अशा मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. मातृभाषा मराठीच समाजातील सर्व व्यवहाराची प्रतिष्ठापणा केल्यास समाजाची सर्वांगीण प्रगती होईल आणि भविष्यातील अभिजात मराठी भाषेचा दर्जा उंचावेल. मराठी भाषा टिकून राहील यासाठी सर्वांनी भाषेचे संर्वधन केले पाहिजे. मराठी भाषेतून मानवी जीवनाचे चित्रण करणारे दर्जेदार साहित्य निर्माण झाले पाहिजे.

भाषेला मानवी जीवनात अत्यंत महत्वाचे स्थान असून जिव्हाळ्याचे अनेक स्थानाबरोबर माझी भाषा म्हणून प्रत्येकाला आपल्या भाषेचा अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. भाषा हा सामाजिक वारसा व समाजव्यवहार सुरळीतपणे चालविण्याचे विनिमय साधन असते.  त्यामुळे समाजातील भिन्न भिन्न प्रवृतींचा समन्वय घडविणे, सर्व व्यक्तींना सहकार्यक्षम बनविणे शक्य होते असे सर्वसामान्याच्या स्वाधीन असणारे श्रेष्ठ विनिमय साधन म्हणजे भाषा होय. मराठी सारस्वतकारानी प्रज्ञेच्या प्रतिभेच्या बळावर मराठीची श्रीमंती वाढविली आहे. अशा साहित्यीकांबद्दल आणि स्वभाषेबद्दल मराठी भाषकांनी स्वाभिमान, कृतज्ञता बाळगणे गरजेचे आहे. मराठी भाषेवर इतिहासकाळात अनेक आक्रमणे झाली तरी तिने आपले अस्तित्व न गमविता आपले सत्व टिकविले आहे. अशा मराठी भाषेचे संगोपन, संवर्धन करणे हे मराठी भाषिकांचे कर्तव्य आहे.

आज जागतिकीकरण व माहिती तंत्रज्ञानामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यवहारात इंग्रजीचे प्राबल्य दिवसेंदिवस वाढत आहे. शासकीय व्यवहार, सार्वजनिक प्रतिष्ठाने, उद्योगधंदे, व्यापार, शिक्षण आणि दैनंदिन जीवनव्यवहारातही मराठीची पिछेहाट होत आहे. त्यासाठी मराठी भाषिकांत भाषिक आस्मिता तयार करणे, मराठीचा कस सुधारणे, तिच्या वापराची कक्षा वाढविणे, व्यवहारात व व्यवसायात तिला प्रतिष्ठी प्राप्त करून देणे, मराठी साहित्य व यांचा विकास घडवून आणण्यासाठी अनुकूल वातावरण तयार करणे ही आज मराठी भाषिकांसमोरील आव्हाने आहेत. या आव्हानांना तोंड देण्यासाठी जनमत तयार करण्याची आवश्कता आहे. मराठी भाषिकांनी मराठीच्या संवर्धनासाठी विविध समारंभाच्या पत्रिका, विविध शुभेच्छा, पत्रव्यवहार, ओळखपत्रे, दारावरील पाट्या, दुकानांचे फलक, पोष्टाच्या तारा मराठीतच लिहिल्या पाहिजेत. आपली सही मराठीतच केली पाहिजे तरच खऱ्या अर्थाने मराठी भाषिक म्हणून आपली ओळख पटेल. मराठी समाज, मराठी माणसांचे जीवन आणि त्यातून निर्माण होणारे मराठी साहित्य यांच्या संबंधात निर्माण होणाऱ्या प्रश्नांची चिकित्सा करणे आणि जमल्यास त्यांची उत्तरे शोधणे, हे प्रत्येक साहित्यसंमेलनाचे प्राप्त कर्तव्य

असते. या प्रश्नांना अग्रस्थान देवून हे प्रश्न संमेलनातून चर्चिले गेले पाहिजेत अन्यथा आपल्या संमेलनांच्या यात्रांचे जत्रेत रूपांतर होण्यास वेळ लागणार नाही. म्हणजेच पदवीपर्यंतचे आणि पदव्युत्तर शिक्षणांसाठी मराठीत पुस्तके दिली तर विद्यार्थी मराठीत का शिकणार नाहीत? त्यांना अधिक समजेल ते अधिक नीट विचार करू शकतील. त्यासाठी स्वतंत्र मराठी विद्यापिठाची स्थापना झाली पाहिजे.

## VI. समारोप

कवी माधव ज्युलियन यांनी 'मराठी आमुची असे आमुची मायबोली…' महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या आधी लिहिलेली ही एक महत्त्वाची कविता मराठी अभिजातभाषा झाल्यास मराठीच्या दिव्य यशाची मराठी कवीला आशा होती ती आज कितपत सत्यात उतरलेली दिसते? ती तशी उतरावी म्हणून मराठी भाषिक लोक नक्की काय प्रयत्न करतायेत? हे महत्त्वाचे आहे. सांस्कृतिक आणि सामाजिक दृष्ट्या पुढारलेल्या लोकांच्या आणि त्यांना श्रेष्ठ मानल्याने इतरांच्या वागण्यात मराठीच्या सर्वांगीण विकासाला खीळ घालणाऱ्या काही गोष्टी आहेत का? असा प्रश्न उपस्थित होतो. कुठलीही भाषा जितकी वापरात राहिल तितकी बहरते. तिचा वापर कमी करणाऱ्या काही गोष्टी बदलणे आपल्या हातात आहेत. उदा., घरी लहान मुलांशी मराठीत बोलणे, घराबाहेर पडल्यावर मराठी न वापरण्याचा कल आज मुंबई बाहेरही पसरलेला दिसतो. महाराष्ट्राच्या छोट्या शहरामध्ये तसेच गावामध्येही हिंदी भाषेने प्रवेश केलेला दिसून येतो. कित्येक मुले- मुली एकदा शहरी भाषा शिकली की पुन्हा गावाच्या ढंगात बोलायला लाजतात काहींचीतर सवय मोडते. त्यामुळे कितीतरी बोली लोप पावतात. मराठी भाषा ही भारतातल्या इतर सर्व भाषाप्रमाणे सर्वधर्मीयांची भाषा आहे. हिंदू लोक बहुसंख्य असले तरी येथील मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध, जैन जे जे मुळचे या मातीचे आहेत त्यांची मातृभाषा मराठीच होती आणि यापुढेही मराठीच असणार आहे.

## संदर्भ

१. 'साहित्यातून समाजदर्शन भाग २' , केसरी मुद्रणालय, नारायण पेठ पुणे, जुलै २००३ पृष्ठ क्र. ११६
२. डॉ. पाटील विलास (संपा) 'वाङ्मयधारा' , झुंझार प्रकाशन, कोल्हापूर, २६ जानेवारी २००५ पृष्ठ क्र. १४८
३. तत्रैव २४९
४. डॉ. देवी गणेश: 'लोकराज्य मराठी' , फेब्रुवारी २०१४ पृष्ठ क्र १८
५. डॉ. रसाळ सुधीर: (पुस्तक परिचय डॉ. गुंडी निलीमा) 'मराठी भाषेचे वर्तमान स्वरूप' , दैनिक सकाळ 'सप्तरंग' १५ मार्च २०२६.